# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६००४.

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये इयता ५ वी व इयता ८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या व जानेवारी-फेब्रुवारी २०२४ मध्ये होणा-या मुल्यमापन सत्रासाठी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी प्रवेश अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०१/०९/२०२३ पासून दिनांक १५/०९/२०२३ ( रात्री ११:५९ वाजेपर्यंत ) या कालावधीत स्विकारण्यात येणार आहेत.

उपरोक्त ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज भरण्यास व कागदपत्रे स्विकारण्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठीचा दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | शुक्रवार दिनांक ०१/०९/२०२३ ते शुक्रवार दिनांक १५/०९/२०२३ ( रात्री ११.५९ वा. पर्यंत) | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी अर्ज भरणे. |
| २ | शनिवार दिनांक ०२/०९/२०२३ ते बुधवार दिनांक २०/०९/२०२३ | विद्यार्थ्यांनी मुळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करणे. |
| ३ | शुक्रवार दिनांक २९/०९/२०२३ | संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

उपरोक्त तक्त्यात नमूद कालावधीमध्ये मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळाचा वापर करावा.

**संकेतस्थळ- http://msbos.mh-ssc.ac.in**

(अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी )

( डी.एस.पोवार )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर